नि. फौ. ख. क्र.८४/२०२०
सरकार विरुध्द सतिष व ईतर
निशाणी क्र.६२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६**
मी शपथेवर निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| नाव– | **शेख शादुल महेबुब साब,** |
| वय– | **५५** वर्षे, धंदा– मिस्त्री, |
| रा. | **सायखेड, ता. धर्माबाद, जि. नांदेड.** |

**<u>सरकारी वकील श्रीमती. सी. बी. काळे यांच्यामार्फत साक्षीदाराचा शपथेवर सरतपास सुरु.</u>**

०१. मी आरोपींना ओळखतो. ते माझया गावातील आहेत. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. फिर्यादी अमृत डुमणे यांना मी ओळखतो ते माझया गावचे आहेत. दिनांक ०६/०८/२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलावले नाही. त्यादिवशी पोलीसांनी माझया समक्ष पंचनामा केला नाही. काही जप्त केले नाही. आता मला एक जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**{साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने त्याला सुचक स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी सहा. सरकारी वकील यांनी मागितली व परवानगी देण्यात आली.}**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६/०८/२०२० रोजी पोलीसांनी मला जप्ती पंचनामा करण्यासाठी पोलीस स्टेशन धर्माबाद येथे बोलावले होते व मी तेथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथे गेलो असता आरोपी सतिष डुमणे याने एक गैरी लाकुड लांबी दोन फुट काळपट झालेले व एका बाजुने चिरलेले जुनाट लाकुड पोलीसांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष एक गैरी लाकुड जप्त केले व जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, तो जप्ती पंचनामा पोलीसांनी मला वाचुन दाखवला त्यानंतर मी त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना

वाचवण्याकरिता व त्यांना शिक्षा होऊ नये म्हणुन मी आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

**सरतपास–पुर्ण**

**आरोपीचे विधीज्ञ श्री. यु.बी. बिलोलीकर यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास नाही.**

दिनांक १८/०३/२०२६
वा.दा.ब.अ.क.केले.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/–

(एस.एम.कोळेकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.

सही/–

(एस.एम.कोळेकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.